<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>कार्यक्रम</th><th>दिनांक</th></tr>
<tr><td rowspan="2">१८.</td><td>रिक्त जागांकरिता 'केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरी'</td><td>०७-०९-२०२६ ते १२-०९-२०२६</td></tr>
<tr><td>(परिशिष्ट 'एच' मध्ये नमूद करण्यात आलेल्या 'प्रवेश प्रक्रिया केंद्रा'वर व परिशिष्ट 'आय' येथील कार्यपध्दतीनुसार)
<table>
<tr><th>दिनांक</th><th>अंतिम गुणवत्ता यादीतील पर्सेंटाईल (इतर अधिभारासह)</th></tr>
<tr><td>०७-०९-२०२६</td><td>८५ व त्यापेंक्षा अधिक</td></tr>
<tr><td>०८-०९-२०२६</td><td>६५ व त्यापेंक्षा अधिक</td></tr>
<tr><td>०९-०९-२०२६</td><td>५० व त्यापेंक्षा अधिक</td></tr>
<tr><td>१०-०९-२०२६</td><td>३५ व त्यापेंक्षा अधिक</td></tr>
<tr><td>११-०९-२०२६</td><td>सर्व पात्र उमेदवार.</td></tr>
<tr><td>१२-०९-२०२६</td><td>सर्व पात्र उमेदवार (जागांच्या रूपांतरासह)</td></tr>
</table>
</td><td></td></tr>
</table>

P

## परिशिष्ट 'आय'

## केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीसाठी प्रवेश प्रक्रिया केंद्रनिहाय महाविद्यालयांचा तपशील

| अ. क्र. | प्रवेश प्रक्रिया केंद्र | संपर्क अधिकाऱ्याचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक | प्रवेश प्रक्रिया केंद्रांतर्गत महाविद्यालये |
|---|---|---|---|
| १. | **डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, राहुरी जि.अहिल्यानगर** | **प्रा. एम. एस. पटवर्धन ९४२२०८१४८७** | अहिल्यानगर, नाशिक, धुळे, नंदूरबार व जळगाव हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित महाविद्यालये |
| २. | **कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.** | **श्री. आर.एच निक्रड ९४२२७५१६१६** | पुणे, सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूर हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित सर्व महाविद्यालये. |
| ३. | **कृषी महाविद्यालय, अकोला ४४४ १०४.** | **डॉ. व्ही. व्ही. उज्जैनकर ८०८७३८७१८८** | अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा हया जिल्हयातील सर्व घटक / अनुदानित / विना अनुदानित महाविद्यालये |
| ४. | **कृषी महाविद्यालय, नागपूर ४४४ ००१.** | **डॉ. एम. के. राठोड ८२७५०३९५२२** | नागपूर, वर्धा, भंडारा, गडचिरोली, गोंदिया व चंद्रपूर हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित सर्व महाविद्यालये. |
| ५. | **कृषी महाविद्यालय, कृषी नगर, परभणी ४३१४०२.** | **डॉ. आर.व्ही. चव्हाण ९४२३६१५४६०** | परभणी, हिंगोली, नांदेड, हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित महाविद्यालये |
| ६. | **कृषी महाविद्यालय, नांदेड रोड, लातूर ४१३५१२.** | **डॉ. ए. टी. शिंदे ७५८८५७१६०२** | लातूर, बीड व धाराशीव हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित महाविद्यालये |
| ७. | **कृषी महाविद्यालय, बदनापूर जि.जालना** | **डॉ. अर्चना ए. चौधरी ७५८८५९८२६१** | जालना व छत्रपती संभाजीनगर हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित महाविद्यालये |
| ८. | **कृषी महाविद्यालय, दापोली जि.रत्नागिरी** | **डॉ. एम. बी. निकम ८८५०२९५२०२** | रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, पालघर हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित सर्व महाविद्यालये. |

## परिशिष्ट 'जे'

## केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीची कार्यपध्दती

केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीपूर्वी राबविण्यात आलेल्या प्रवेश फे-यांद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी नोंदणी न केल्याने अथवा इतर कारणाने जागा रिक्त असल्यास अशा रिक्त जागांसाठी प्रवेश प्रक्रिया केद्रांवर खालील कार्यपध्दतीने केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरी राबविण्यात येईल.

यापूर्वी राबविण्यात आलेल्या प्रत्येक प्रवेश फेरीतील अंतिम गुणवत्ताविषयक प्रवर्गनिहाय (Categorywise Last Merit) तपशील व अद्ययावत रिक्त जागांचा प्रवर्गनिहाय तपशील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**राज्यस्तरीय / विद्यापीठस्तरीय गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या पदवी प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले (not admitted) उमेदवार केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीकरिता पात्र असतील.** अशा पात्र उमेदवारांनी तसेच प्रवेश प्रक्रिया केंद्रांनी खालील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरी फक्त 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'वर राबविण्यात येईल. कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावरील महाविद्यालयांच्या ठिकाणी केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरी राबविण्यात येणार नाही. 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'वर ज्या ज्या महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे, त्याबाबतचा प्रवेश प्रक्रिया केंद्रनिहाय तपशील परिशिष्ट **'आय'** मध्ये देण्यात आला आहे.

(२) संकेतस्थळावरील रिक्त जागांचा तपशील विचारात घेऊन उमेदवारांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या महाविद्यालयाशी संबंधित 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'वर आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उमेदवारांनी उपस्थित राहावे. याबाबत दिनांकानिहाय तपशील अंतिम वेळापत्रकामध्ये नमूद करण्यात येईल.

(३) अंतिम वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांकास 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'नी सकाळी ९.०० ते ११.०० या वेळेत त्यांच्याकडे उपस्थित असलेल्या उमेदवारांची संगणकावर नोंद घ्यावी. अशा उपस्थित असलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करून संबंधित 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'स दोन तासाच्या कालावधीत म्हणजेच दुपारी १.३० पर्यंत पुरविण्यात येईल. प्रत्येक दिवसाची स्वतंत्र गुणवत्ता यादी असेल. ही गुणवत्ता यादी फक्त त्याच दिवसासाठी ग्राह्य असेल.

(४) वरीलप्रमाणे पात्र उमेदवारांचा गुणानुक्रमे विचार करून रिक्त जागांसाठी प्रवेश देण्यात यावेत. **आरक्षित प्रवर्गातील रिक्त जागांसाठी संबंधित प्रवर्गाच्या उमेदवारांनाच प्राधान्यक्रमाने प्रवेश देण्यात यावेत.** संबंधित आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.मकृवि-२०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०/१०/२०११ मधील परिशिष्ट २ येथील प्रवेश कार्यपध्दतीनुसार अशा रिक्त जागांवर 'केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या' शेवटच्या दिवशी उपस्थित असलेल्या इतर उमेदवारांना गुणानुक्रमाने प्रवेश देण्यात यावेत. **मात्र**

**कोणत्याही परिस्थितीत आरक्षित जागांवर प्रवेश मिळाला नाही, अशी तक्रार आरक्षित प्रवर्गाच्या उमेदवारांकडून कोणत्याही परिस्थितीत येणार नाही, याची दक्षता संबंधित 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'नी घ्यावी.**

(५) योग्य त्या उमेदवाराची प्रवेशासाठी निवड निश्चित झाल्यास त्याप्रमाणे **संकेतस्थळावर नोंदणी करून 'लॉग इन'द्वारे** 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'नी **संबंधित उमेदवारास प्रवेश द्यावा.** यासाठी संकेतस्थळावर 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'च्या 'लॉग इन'मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

(६) 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'नी दरदिवशी प्रवेश देण्यात आलेल्या प्रवेशांबाबतचा तपशील **संचालक (शिक्षण) यांच्याकडे सायंकाळी ५.०० वाजेपूर्वी ई-मेलद्वारे कळवावा.**

(७) केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीद्वारे प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारास संबंधित 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'कडून तात्पुरते 'प्रवेश वाटप पत्र' देण्यात येईल.

(८) 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'शी संबंधित असलेल्या प्रत्येक महाविद्यालयाच्या एका प्रतिनिधीने संबंधित 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'त केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या कालावधीमध्ये उपस्थित रहावे. या प्रतिनिधीने त्यांच्या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची आवश्यक ती कागदपत्रे व नियमानुसार प्रथम सत्राच्या शुल्काची रक्कम प्राप्त करून घ्यावी. याबाबत उमेदवारास पावती द्यावी.

(९) केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या कालावधीमध्ये उमेदवाराने प्रवेश रद्द केला असल्यास किंवा इतर कारणामुळे प्रवेश रद्द केल्यास, यामुळे रिक्त झालेली जागा त्याच दिवशी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, मात्र त्याच दिवशी भरण्यात येऊ नये. अशी रिक्त जागा दुस-या दिवसापासून प्रवेशाकरिता उपलब्ध करून देण्यात यावी. (केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या शेवटच्या दिवशी रिक्त होणा-या जागांसंदर्भात ही बाब लागू नसेल.)

(१०) प्रत्येक उमेदवाराकडून प्राप्त केलेले रू. १०००/- 'जागा स्वीकृती शुल्का' द्वारे जमा झालेली रक्कम, केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरी संपल्यानंतर पाच दिवसांच्या कालावधीत महाविद्यालयाच्या लॉगइनद्वारे सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या खात्यावर जमा करावी. यासाठी प्रत्येक महाविद्यालयाच्या लॉगइनमध्ये रक्कम जमा करण्याची सुविधा (payment gateway) उपलब्ध असेल.